# कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ [म्हाडाचा घटक]

**कोंकण मंडळ सोडत सन २०१८ मधील संकेत क्र.२७१,मौजे खोणी. ता.कल्याण, जि,ठाणे येथील प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत प्रकल्पातील इमात क्रमांक २अ, २ब, २क. २ड व ३अ, ३ब, ३क . ३ड ची भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले असून शेवटच्या हप्त्याची मुदत निर्धारित करणे व सदनिका वितरणा व ताबा देण्याची कार्यवाही सुरू करणेबाबत**

## जाहीर निवेदन

कोंकण मंडळ सोडत सन २०१८ मधील संकेत क्र.२७१,मौजे खोणी. ता.कल्याण, जि,ठाणे येथील प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत प्रकल्पातील इमात क्रमांक २अ , २ब , २क . २ड व ३अ, ३ब, ३क . ३ड ची भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

सदर प्रकल्पातील पात्र अर्जदारांना पणन/कोंकण मंडळ विभागामार्फत सदनिका विक्री किंमतीचा भरणा करण्यासाठी सन-२०१८ पासून तात्पुरते देकारपत्र निर्गमित करण्यात आलेले आहेत. तथापि कोविड-१९ महामारीमुळे तसेच इतर तांत्रिक कारणास्तव योजनेतील इमारतीच्या बांधकाम प्रगतीवर परिणाम झाल्याने सदर प्रकल्पातील अर्जदारांना सदनिका विक्री किंमतीचा भरणा करण्यासाठी हप्ते सुधारित करण्यात आले आहे. त्यानुसार ज्या अर्जदारांनी ९०% व १००% रक्कमेचा हप्ता भरला आहे त्या अर्जदारांना दिनांक १८/०१/२०२३ च्या जाहिर निवदेनाच्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन शेवटचा हप्ता (१० %) माफ झालेला आहे तथापि ज्या अर्जदारांनी आजमितीपर्यंत (१० %) ते (८० %) भरणा केलेला आहे त्या सर्व अर्जदारांनी शेवटचा हप्ता निवासी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर भरणा करण्याचे जाहीर निवेदन मा.उपाध्यक्ष/ प्रा यांच्या मान्यतेने सन-२०२१ मध्ये म्हाडा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

तरी सदर प्रकल्पास सद्स्थितीत भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्याने ज्या अर्जदारांनी ०६/१०/२०२२ पर्यंत विक्री किंमतीपोटी (१० %) रक्कमेचा भरणा केलेला आहे परंतु ३१/०१/२०२३ पर्यंत (१० %) ते (८० %) **रक्कमेचा भरणा केलेल्या सर्व अर्जदारांना विक्री किंमतीचा एक ते पाच हप्ते व शेवटचा हप्ता (१० %) चा भरणा करणेसाठी सदर निवेदनाव्दारे दि. २८.०२.२०२३ पर्यंत मुदत निर्धारित करण्यात येत आहे.**

तसेच सदर प्रकल्पास भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त असून ज्या अर्जदारांनी सद्स्थितीत संपूर्ण रकमेचा (१००%) केलेला आहे अशा अर्जदारांना सदनिका वितरण व ताबा देण्याची कार्यवाही पणन विभाग/कोंकण मंडळ यांचेकडुन करण्यात येत आहे.तरी अशा अर्जदारांनी सदनिकेच्या वितरण व ताबा संदर्भात उपमुख्य अधिकारी /पणन/कों.मं. या कार्यालयाशी पुढील कार्यवाही करिता संपर्क साधावा . कृपया याची नोंद घ्यावी.

मा. मुख्य अधिकारी/कों.मं. यांच्या मान्यतेने.

उपमुख्य अधिकारी,
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई